**दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ७६/२०२६**
**निशाणी क्रमांकः– ११ खाली**
**देवेंद्र पगारे व इ. वि. कोणीही नाही.**

**अर्जदार तर्फे साक्षीदार क्रमांक १ यांची शपथेवरील जबानी**
मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,
माझे नावः– देवेंद्र प्रल्हाद पगारे

**सरतपास अर्जदार तर्फे वकील श्री. प्रशांत वाघमारे यांचे मार्फत सुरू**

**०१.** सदर प्रतिज्ञापत्रातील मजकूर माझे सांगण्याप्रमाणे लिहिलेला आहे व तो बरोबर आहे व तो वाचल्यानंतर मी त्यावर सही केली. माझ्या वडिलांच्या मृत्युचे मुळ प्रमाणपत्र दाखल केले आहे. त्यास **नि.१२** देण्यात येत आहे. आजीच्या मृत्यूच्या दाखल्याची झेरॉक्स प्रत दाखल केली आहे व मुळ प्रत मी सोबत आणली आहे. मुळ वरून झेरॉक्स पडताळून पाहिली ती बरोबर आहे. झेरॉक्सला **नि.१३** देण्यात येत आहे. सिडकोने मुख्य प्रवर्तक साई को. हौ. सो. यांना दिलेल्या दि. ०१/०७/१९९९ च्या ॲलॉटमेंट लेटरची झेरॉक्स प्रत दाखल केली आहे व मुळ प्रत मी सोबत आणली आहे. मुळ वरून झेरॉक्स पडताळून पाहिली ती बरोबर आहे. झेरॉक्सला **नि.१४** देण्यात येत आहे. साई पुजा को. हौ. सो. यांनी माझ्या वडिलांना दि. १७/०७/१९९९ रोजी दिलेल्या ॲलॉटमेंट लेटरची झेरॉक्स प्रत दाखल केली आहे व मुळ प्रत मी सोबत आणली आहे. मुळ वरून झेरॉक्स पडताळून पाहिली ती बरोबर आहे. झेरॉक्सला **नि.१५** देण्यात येत आहे. सदर सोसायटीने माझ्या वडिलांना त्याच मालमत्तेबाबत दिलेल्या शेअर सर्टीफिकेटची झेरॉक्स प्रत दाखल केली आहे व मुळ प्रत मी सोबत आणली आहे. मुळ वरून झेरॉक्स पडताळून पाहिली ती बरोबर आहे. झेरॉक्सला **नि.१६** देण्यात येत आहे.

**०२.** दैनिक किल्ले रायगड या पेपरमध्ये दि.२६/०१/२०२६ रोजी जाहिर नोटीस प्रकाशित केली होती तो पेपर मी दाखल केलेला आहे. त्यास **आर्टिकल अ** देण्यात येत आहे.

**सरतपास पूर्ण.**
**फेरतपास काही नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत.

RAJESH YASHWANTRAO KHANDARE
Digitally signed by RAJESH YASHWANTRAO KHANDARE
Date: 2026.04.16 13:54:55 +0530

**ठिकाणः पनवेल** **(आर. वाय.खंडारे)**
**दिनांकः– १६/०४/२०२६.** **५वे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, पनवेल**